सकाळ



कोल्हापूर : पंजाब येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाचे लोकनृत्य आणि लोकवाद्यवृंद हे दोन संघ रवाना झाले. त्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.

# आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाचे संघ रवाना

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवाडा (पंजाब) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाचे लोकनृत्य आणि लोकवाद्यवृंद हे दोन संघ रवाना झाले. बंगळूर येथील जैन युनिव्हर्सिटीत ३६ वा राष्ट्रीय युवा महोत्सव झाला. त्यातून विद्यापीठाच्या लोकनृत्य, लोकवाद्यवृंद संघांची ६ ते ८ एप्रिलदरम्यान लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झाली.

या महोत्सवात विद्यापीठाच्या दोन्ही संघांतून एकूण २६ सदस्य सहभागी होतील. हा संघ स्पर्धेसाठी रवाना झाला. तो १२ एप्रिलला परतणार आहे. विद्यापीठ संघाचे प्रमुख म्हणून डॉ. टी. पी. शिंदे (मुधोजी महाविद्यालय, फलटण) आणि एस. ए. मोरे (वरिष्ठ सहायक, विद्यार्थी विकास विभाग) काम पाहणार आहेत. या संघाला कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

लोकमत

# युवा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठ संघाची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पंजाब येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ सोमवारी रवाना झाला. बंगळुरू येथील जैन युनिव्हर्सिटीत २४ ते २८ फेब्रुवारी या काळात झालेल्या ३६ व्या राष्ट्रीय युवा महोत्सव २०२२-२०२३ मध्ये शिवाजी विद्यापीठाचा एकूण ३५ सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. या युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाने विविध गटांत यश मिळविले.

या संघाने रॅलीमध्ये प्रथम क्रमांक, दहा विद्यार्थी सहभागी झालेल्या लोकनृत्यात प्रथम क्रमांक, पाश्चिमात्य समूहगीत स्पर्धेत प्रथम क्रमांक, लोकवाद्यवृंदात तृतीय क्रमांक मिळविला आहे. या स्पर्धेत सहभागी एकूण २५ विद्यार्थांना सुवर्णपदक तसेच ९ विद्यार्थ्यांना रौप्यपदक मिळाले आहे. एकूण १२४ विद्यापीठांतून शिवाजी विद्यापीठास रॅलीसाठी प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. 'ढोलू कुनिथा' या लोकनृत्यास राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या एकूण ३६ वर्षांच्या इतिहासामध्ये शिवाजी विद्यापीठास प्रथमच सुवर्णपदक प्राप्त झाले.

दि. ६ ते ८ एप्रिल या कालावधीत लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवाडा (पंजाब) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठ संघातील लोकनृत्य आणि लोकवाद्यवृंद या दोन कलाप्रकारांची निवड झाली आहे.

पुढारी

# मुटकोर्टमुळे सक्षम विद्यार्थी घडण्यास मदत : डॉ. महाजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून कोर्टात युक्तिवाद कसा करावा याचा प्रत्यक्ष अनुभव मूटकोर्ट द्वारे विद्यार्थ्यांना मिळतो. त्यामुळे सक्षम विद्यार्थी तयार होतात, असे प्रतिपादन डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले

शिवाजी विद्यापीठ विधी विभागातर्फे मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्या. सुनिल कोतवाल म्हणाले, विधी पदवीधर व युवा वकिलांनी यशस्वी होण्यासाठी केवळ कायद्याचे ज्ञान घेऊन उपयोग नाही. त्यांनी सभोवतालच्या घडामोडींकडे लक्ष ठेवून चौफेर ज्ञान मिळविणे गरजेचे आहे. निवृत्त न्या. एस. पी. कुलकर्णी, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे उपाध्यक्ष विवेक घाटगे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जिल्हा बार असोसिएशन अध्यक्ष गिरीश खडके, निवृत्त प्राचार्य आर. नारायणआदी उपस्थित होते. सूत्रसंचालन मानसी क्षीरसागर यांनी केले. डॉ विवेक धुपदाळे यांनी आभार मानले.

पुढारी

# भारती विद्यापीठ फार्मसी कॉलेजला विजेतेपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत आयोजित फार्मा करंडकमध्ये भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीला विजेतेपद मिळाले आहे.

विद्यापीठाच्या वतीने नुकताच केशवराव भोसले नाट्यगृहात नुकतीच फार्मा करडंक-२०२३ सांस्कृतिक स्पर्धा झाली. सांघिक स्पर्धेमध्ये भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीने प्रथम क्रमांक पटकावला. वैयक्तिक स्पर्धेत अपूर्वा साळुंखेने उत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक मिळवले. स्पर्धकांना सांस्कृतिक विभाग एस. एस. पाटील, दिग्दर्शक सुदर्शन खोत यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे मानद संचालक डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटीया, उपप्राचार्य डॉ. एन. आर. जाधव यांनी अभिनंदन केले.



0 5 APR 2023
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विधी, कला-वाणिज्य-विज्ञान शाखेची प्रवेश क्षमता वाढणार; राज्य शासनाकडून इरादापत्र मंजूर

# जिल्ह्यात सात नव्या महाविद्यालयांची भर

**संतोष मिठारी :**
सकाळ वृत्तसेवा


कोल्हापूर : जिल्ह्यातील उच्च शिक्षण क्षेत्रात यंदाच्या शैक्षणिक वर्षात सात नव्या महाविद्यालयांची भर पडणार आहे. त्यात कला-वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेची पाच, तर विधी (लॉ) अभ्यासक्रमाच्या दोन महाविद्यालयांचा समावेश आहे. त्यामुळे संबंधित विद्याशाखेची जिल्ह्यातील एकूण प्रवेश क्षमता वाढणार आहे. ही महाविद्यालये सुरू करण्याबाबत राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने इरादापत्र मंजूर केले आहे.

जिल्ह्यातील आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ, बाळासाहेब बाडे फाउंडेशन, दि न्यू एज्युकेशन सोसायटी, सिंधू एज्युकेशन सोसायटी, आजरा महाल शिक्षण मंडळ, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ज्ञान विज्ञान शिक्षण प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी दिलेले इरादापत्र कायम विना अनुदानित तत्त्वावर महाविद्यालय सुरू करण्याकरिता आहे. इरादापत्रानंतर शिवाजी विद्यापीठाच्या समितीकडून या महाविद्यालयांसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांची पाहणी करून अंतिम मान्यतेचा प्रस्ताव शासनाला सादर केला जाईल. ही मान्यता मिळाल्यानंतर इरादापत्राची वैधता संपण्यापूर्वी संबंधित शैक्षणिक संस्थांनी नवीन महाविद्यालय सुरू करण्याची प्रक्रिया पूर्ण करायची आहे.

### नवीन महाविद्यालये अशी

- -आनंदी विधी महाविद्यालय, कळंबे तर्फ कळे (ता. करवीर),
- -सरदार रामचंद्र बाडे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज पुनाळ (ता. पन्हाळा)
- -तुळशी-धामणी कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय धामोड (ता. राधानगरी)
- -सिंधु सीनिअर कॉलेज गांधीनगर (ता. करवीर)
- -व्यंकटराव कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय आजरा
- -सूर्यकांत सदाशिव दिंडे (बापू) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गणेशवाडी-बीडशेड (ता. करवीर)
- -दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज इचलकरंजी (ता. हातकणंगले)

### विद्याशाखानिहाय जिल्ह्यातील सध्याची महाविद्यालये




> शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील बृहत आराखड्यातील निश्चित बिंदूनुसार १६ शिक्षण संस्थांनी नवीन महाविद्यालयासाठी शासनाला प्रस्ताव सादर केले होते. त्यापैकी ९ संस्थांना इरादापत्र मिळाले आहे. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील सात आणि सांगलीतील दोन संस्थांचा समावेश आहे. या संस्थांचे नवीन महाविद्यालयाबाबतचे प्रस्ताव अधिकार मंडळासमोर ठेवण्यात येतील. त्यानंतर ता. ३० एप्रिलपूर्वी अंतिम मान्यतेसाठी ते प्रस्ताव शासनाला सादर केले जातील.
>
> **-व्ही. एस. सोयम,** उपकुलसचिव, संलग्नता विभाग शिवाजी विद्यापीठ